(13) निमब

दि.23/ 6 /2026

# बेलिफ रिपोर्ट

प्रकरण :- किरकोळ दिवाणी अर्ज क्र. 896 /2026 ........................................

प्रतिज्ञेवर सविनय सेवेत रिपोर्ट सादर की, दि.23/6 /2026 रोजी 1) ग्रामपंचायत कार्यालय ............ ता.जि.बीड व दि.23 / 6 /2026 रोजी 2) तहसिल कार्यालय, बीड, 3) मा.दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड येथील नोटीस बोर्डवर सदर जाहीर प्रगटनाची प्रत्येकी एक-एक प्रत डकवून उपस्थित कर्मचारी / सरपंच / हजर समक्ष पंच यांच्या सहया व शिक्का मुळ गोषवारा प्रतीवर घेतले आहेत. तसेच दि.23/ 6 /2026 रोजी (4) मयताच्या राहत्या घराच्या दर्शनी भागावर सदर जाहीर प्रगटनाची एक प्रत डकवून कुटूंबातील सदस्य / हजर समक्ष पंच यांची मुळ गोषवारा प्रतीवर सही / स.नि.अंगठा घेतली आहे.

करीता सदर जाहीर प्रगटनाची डकवून बजावणी करुन सेवेत रिपोर्ट सादर.

समक्ष प्रा.क्र. 23/6/ " समक्ष " आर. आर. मोरे

[बेलिफ]

6127

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर
बीड

गोषवारा

# जाहीर प्रगटन

ॲड.एस आर कांबळे

मा. श्रीमती एम एस पठारे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज ८९६/२०२६**

**भगवान भागुजी कांबळे व इतर विरुध्द निरंक**

**अर्जदार :—**

**१. भगवान भागुजी कांबळे, वय—५० वर्षे, धंदा—शेती ,**
**रा. उमरद (ज.). पो. पारगांव (शिरस), ता. जि. बीड**

**२. संजय पि. भागुजी कांबळे, वय—४८ वर्षे, धंदा—खाजगी नौकरी,**
**रा. उमरद (ज.). पो. पारगांव (शिरस), ता. जि. बीड, ह. मु. रा. गोकुळ नगर, अलठाण भातर, सुरत गुजरात**

**३. संभाजी पि. भागुजी कांबळे, वय—४६ वर्षे, धंदा—शेती,**
**रा. उमरद (ज.). पो. पारगांव (शिरस), ता. जि. बीड**

**४. गांधारी भ्र. राजु शेलार, वय—५५ वर्षे, धंदा—घरकाम,**
**रा. उत्तम नगर, दहिवंडी, पो. वारणी, ता. शिरुर (का), जि. बीड**

**गैरअर्जदार :—** निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

**मागणी अर्ज:— बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत कस्तुराबाई भागुजी कांबळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत कस्तुराबाई भागुजी कांबळे** यांचा मृत्यु दिनांक ११.०६.२०२५ रोजी उमरद (ज.), ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क्र १ ते ३ हे मयत यांचे मुले असुन अर्जदार क्र ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे पती भागुजी सावळा कांबळे हे दिनांक ०५.०९.१९९८ रोजी मयत झालेले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत कस्तुराबाई भागुजी कांबळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० जुन २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१ जुलै २०२६**

R. मोरे 6127 22/6/26 30/7/

आदेशावरुन,
22/6/26
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

क. लिपीक

याची एक प्रत डकवणे :—

१. मा. दिवाणी न्या. व. स्तर, नोटीस बोर्डावर,
२. ग्रामपंचायत कार्यालय, मौजे उमरद (ज), शहाबाजपुर, ता. जि. बीड, यांचे नोटीस बोर्डावर,
३. मयताचे राहते घरी.
४. तहसिल कार्यालय बीड.
५. स्थळप्रत.

(1) दिवाणी न्यायालय व स्तर नोटीस बोर्ड
बीड ता. जि. बीड

Ved
v.R.mangin

(2) ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्ड
उमरद (ज) ता. जि. बीड

सुदाम

सुदाम कुंडलीक पवार

(3) मयताचे घरी ठिकाणी

भगवान    भगवान आगुजी कांबळे

(4) मा. तहसील कार्यालय नोटीस बोर्ड
बीड ता. बीड

KE

आवक-जावक
तहसील कार्यालय बीड